Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 47100)

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

ISSN 2279-0489

# GENIUS

Volume-VI, Issue-II
February - July - 2018

IMPACT FACTOR / INDEXING
2016 - 4.248 www.sjifactor.com

PART - V

Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

ISSN 2279-0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Volume -VI Issue - II Part - V February - July - 2018

Peer Reviewed and Referred
UGC Listed Journal
(Journal No. 47100)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2016 - 4.248
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

VOLUME - VI - ISSUE - II - FEBRUARY - JULY - 2018
GENIUS - ISSN - 2279-0489 - IMPACT FACTOR - 4.248 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतीय अर्थव्यवस्था: डिजीटल देयक एक काळाची गरज<br>**प्रा. हर्षवर्धन दामोदर जाधव** | १-४ |
| २ | डिजिटल इंडिया आणि आदिवासी समाजातील वास्तव परिथितीचा आढावा<br>**रामदास रमेश वसावे** | ५-७ |
| ३ | डिजिटल भारत: एक चळवळ<br>**विजय भुजंगराव मांटे** | ८-१० |
| ४ | वाणिज्य शाखेतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना डिजिटल पेमेंट सिस्टीमबाबत असलेल्या व्यावहारिक ज्ञानाचा अभ्यास<br>**प्रा. योगिता पांडुरंग चौधरी** | ११-१६ |
| ५ | डिजीटल पेमेंट बी. एड्. प्रशिक्षणार्थ्यांसाठी अद्यावत व तंत्रविज्ञानातून शिक्षणाची संधी<br>**डॉ. दादासाहेब राधाजी पवार** | १७-१८ |
| ६ | भारतीय महिलाओंपर डिजिटल भुगतान के परिणाम<br>**प्रा. लंकेश मुरलीधर गजभिये** | १९-२२ |


Scanned with CamScanner

# ४. वाणिज्य शाखेतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना डिजिटल पेमेंट सिस्टीमबाबत असलेल्या व्यावहारिक ज्ञानाचा अभ्यास

प्रा. योगिता पांडुरंग चौधरी
अ.र.भा. गरुड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, शेंदुर्णी, तालुका-जामनेर, जिल्हा-जळगाव (महाराष्ट्र)

## प्रस्तावना :

नोटाबंदीच्या यशापयशाची चर्चा होत असताना, या मोहिमेमुळे फिनटेक कंपन्यांच्या व्यवहारात अर्थात डिजिटल पेमेंट व्यवहारांत मोठ्या प्रमाणावर वाढ दिसून आली आहे. देशात सध्या कार्यरत असलेल्या फिनटेक कंपन्यांमधून पेटीएम व मोबिक्विक या फिनटेक कंपन्यांची वाढ 'न भूतो न भविष्यति' अशी झाली आहे. अन्य फिनटेक कंपन्या तसेच ई-कॉमर्स कंपन्या यांच्या कारभारातही वाढ झाली आहे. डिजिटल पेमेंट आता अवघड न राहता सोपे झाल्यामुळे स्मार्टफोन वापराचे व इंटरनेट वापराचे जुजबी ज्ञान असलेल्यांमध्येही डिजिटल पेमेंटला वाढती पसंती मिळत आहे. अशी परिस्थिती भारतात असतांना व्यावसायिक बाबींचे शिक्षण घेणाऱ्या वाणिज्य शाखेतील महाविद्यालयीन विद्यार्थांचे डिजिटल पेमेंट सिस्टीम बद्दलचे ज्ञान महत्वपूर्ण आहे. आज मोबाइल रिचार्ज करणे पासून ते सिनेमाचे तिकीट काढेपर्यंत, स्पर्धापरीक्षांची फी भरनेपासून ते ऑनलाईन वस्तू खरेदी करणे पर्यंत अनेक वेळा तरूण डिजिटल पेमेंट करतांना दिसतात. याच स्वरुपात वाणिज्य विद्याशाखेतील महाविद्यालयीन विद्यार्थांना डिजिटल पेमेंट संदर्भातील असलेल्या व्यावहारिक ज्ञानाचे अध्ययन करण्यासाठी सदर संशोधन करण्यात आलेले आहे.

## संशोधन साहित्याचा आढावा :

संशोधन साहित्याचा आढावा घेत असतांना डिजिटल पेमेंट प्रणालीवर प्रसिद्ध झालेले विविध संशोधन लेख अभ्यासण्यात आले. तसेच वर्तमान पत्रातील लेखांचे वाचन करून त्याचासुद्धा आढावा घेण्यात आला. त्यादृष्टीने विषयाशी संबंधित आणि आवश्यक घटकांचा समावेश संशोधन लेखात करण्यात आलेला आहे.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये :

भारतात सध्या विनारोकड व्यवहारांमध्ये वाढ दिसून आली आहे. फिनटेक कंपन्यांच्या मंचावरून पेमेंट होण्याबरोबरच बँका व कार्ड पुरवणाऱ्या कंपन्या यांनीही नोटाबंदीचा फायदा उठवला आहे. रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार व्हिसा, मास्टरकार्ड, अमेरिकन एक्सप्रेस व रुपे या कार्ड पुरवठादार कंपन्यांनी एकत्र येऊन एकमेकांमध्ये वापरता येईल, अशी क्यू-आर कोड आधारित पेमेंट सुविधा निर्माण केली. नोटाबंदीनंतर ई-वॉलेट, युनिफाइड पेमेंट इंटरफेस



Scanned with CamScanner

(यूपीआय) यांची वाढ झाल्यामुळे या क्षेत्राची दुपटीने वाढ झाली आहे. याबाबतचे ज्ञान वाणिज्य शाखेतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आहे का हे जाणून घेणे तसेच पुढील इतर उद्देशांनी संशोधन करण्यांत आलेले आहे.

१. डिजिटल पेमेंट सिस्टीमची संकल्पना अभ्यासाने.

२. वाणिज्य शाखेतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे डिजिटल पेमेंट सिस्टीम बाबत असलेले व्यावहारिक ज्ञान जाणून घेणे.

३. डिजिटल पेमेंट सिस्टीम बाबत असलेल्या समस्या जाणून घेणे.

४. डिजिटल पेमेंट सिस्टीमचा वापर वाढविणेसाठी वाणिज्य शाखेतील महाविद्यालयीन तरुणांमध्ये जागृती करणे.

५. वाणिज्य शाखेतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे डिजिटल पेमेंट सिस्टीम बाबत असलेले व्यावहारिक ज्ञान वाढविणेसाठी उपाय सुचविणे.

## संशोधनाची गृहीतके

संशोधनाची गृहीतके पुढील प्रमाणे आहेत.

१. डिजिटल पेमेंट सिस्टीमचा वापर वाढलेला आहे.

२. काही वाणिज्य शाखेतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना डिजिटल पेमेंट सिस्टीम बाबत व्यावहारिक ज्ञान नाही.

## संशोधनाची व्याप्ती

संशोधन जळगाव जिल्यातील ५ महाविद्यालायाच्या वाणिज्य शाखेतील विद्यार्थांशी संबंधित आहे. बोदवड, जामनेर, पाचोरा आणि भडगाव या तालुक्यातील पाच महाविद्यलयातील वाणिज्य शाखेतील १०० विद्यार्थ्यांचा समावेश करण्यांत आलेला आहे.

## संशोधन पद्धती

व्यावहारिक संशोधन प्रकारातून करण्यांत आलेल्या य संशोधनात माहितीचे संकलन करण्यासाठी पुढील साधनांचा वापर करण्यांत आला आहे.

प्राथमिक माहिती : प्राथमिक मुलाखती आणि प्रश्नावली च्या सहाय्याने संकलित करण्यात आली .

दुय्यम माहिती : पुस्तके,ग्रंथ,वर्तमान पत्रातील कात्रने, अहवाल इ.



Scanned with CamScanner

**माहितीचे विश्लेषण :**

डिजिटल पेमेंट ही काळची गरज आहे. डिजिटल पेमेंट मध्ये कोणतेही आर्थिक व्यवहार करतांना प्रत्यक्ष पैसा न वापरता केवळ ऑनलाइन बैंकिंग, डेबिट कार्ड,क्रेडिट कार्ड,एटीम कार्ड,रुपे,व्हिसा,भीम ऑप,पेटीयम आशा एक ना अनेक मध्यमांचा उपयोग करून पैशांची देवानघेवान करने होय. आज या संकल्पनेचा स्वीकार तरुणाईने करने अत्यंत आवश्यक आहे त्यातच वाणिज्य शाखेत शिक्षण घेणार्या विद्याथ्यांचा पुढाकार अत्यंत महत्वाचे आहे. रोकड़ विरहित व्यवहारांचे फायदे पुढील प्रमाणे आहे.

- रोकडरहित व्यवहार करणे सुलभ आणि सोयीचे असते. तसेच ते रोख रक्कम हाताळण्यापेक्षा अधिक सुरक्षितही असते.
- रोकडरहित व्यवहारांद्वारे अर्थव्यवस्था अधिक प्रगत व विकसित होते, आणि रक्कम प्रदान प्रणाली अत्याधुनिक करता येते. त्याचप्रमाणे, रोकडरहित व्यवहारांमुळे अर्थव्यवस्थेत अधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व स्थापित करणे, आर्थिक व्यवहारांच्या प्रक्रियेचे मूल्य कमी करणे, आणि समांतर व बेकायदेशीर अर्थव्यवस्थेचे निर्मुलन करणे, यांसारखे महत्वाची परिवर्तने करणे शक्य होते.
- व्यापारी वर्गाला त्यांच्या भौगोलिक कक्षांच्या पलीकडे जाऊन व्यापार करणे शक्य होते, त्यांच्या व्यवसायातील ग्राहकांची संख्या वाढवता येते, आणि त्याद्वारे व्यवसायाची वृद्धी करता येते.
- कागदी चलन छापण्याची आवश्यकता कमी झाल्यामुळे कागदाची मागणीत घट होते, परिणामतः कमी झाडे कापली जातात, आणि त्यामुळे साहजिकच पर्यावरण संरक्षणाला आणि संवर्धनाला मोठा हातभार लावता येतो.
- ग्रामीण अर्थव्यवस्था विकासाला हातभार लावता येतो, अर्थातच ग्रामीण जनतेच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते.


वरील फयाद्यांमुळ यूपीआय प्रणालीलाजगभरात मान्यता मिळाली. यूपीआय प्रणालीला 'भारत इंटरफेस फॉर मनी' (भीम) या अॅपची मदत मिळाल्यामुळे त्याचा विस्तार झपाट्याने झाला. यूपीआयचा स्वीकार फोन-ए-पे, गुगल तेज अशा मंचांनीही केला. ही संख्या यंदाच्या ऑक्टोबर २०१७ मध्ये सात कोटी ६० लाख व्यवहारांवर गेली. त्यामुळे यूपीआय व भीम हे दोन्ही जणू समानार्थी शब्द झालेडिजिटल पेमेंट वाढवण्याची जबाबदारी माहिती त्रज्ञान मंत्रालयाकडे सोपविण्यात आली आहे. रेल्वे बोर्डाच्या अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार रेल्वेने तिकीट आणि आरक्षण काउंटर डिजिटल करण्यासाठी प्रयत्न आरंभले आहेत. नव्या मार्गदर्शक तत्त्वानुसार देशातील १४ लाख काउंटरवर भारत क्यूआर कोडची सुरुवात करण्यात येईल. लवकरच रेल्वेची तिकीट काउंटर डिजिटल पेमेंट पद्धतीचा



Scanned with CamScanner


अवलंब करतील. भारतीय रेल्वे दरवर्षी ५२ हजार कोटी रुपयांची तिकीटविक्री करते. त्यापैकी ६० टक्के हिस्सा ऑनलाइन तिकिटांच्या माध्यमातून येतो. म्हनुनच या महत्वपूर्ण संकल्पने संदर्भात वाणिज्य शाखेतील विद्यार्थांना कही प्रश्न विचारन्यांत आले. त्याचे आलेखाच्या स्वरूपातील विश्लेषण पुढील प्रमाणे आहे.

आलेख क्र.१




वरील आलेखावरून असे स्पष्ट होते कि, अभ्यास गट असलेल्या वाणिज्य शाखेतील १०० पैकी प्रत्येक विद्यार्थ्यास डिजिटल पेमेंट काय आहे हे माहित आहे मात्र त्यापैकी फक्त २३ टक्के विद्यार्थ्यांनी डिजिटल पेमेंट सिस्टीमचा प्रत्यक्षात उपयोग केला आहे. यातून फक्त ४८ टक्के विद्यार्थ्यांना डिजिटल पेमेंट करणे सोपे वाटते. डिजिटल पेमेंट केल्यामुळे असुरक्षिता वाटे असे ८१ टक्के विद्यार्थ्यांना वाटते. डिजिटल पेमेंट करतांना समस्या मोठ्या प्रमाणावर भेडसावतात असे ७९ टक्के विद्यार्थ्यांना वाटते. इंटरनेट, ॲनरोइड मोबाएल, नेटवर्क असे संसाधने कमी प्रमाणात उपलब्ध असतात असे ६६ टक्के विद्यार्थ्यांना वाटते. डिजिटल पेमेंट जास्त खर्चीक आहे असे ३५ टक्के विद्यार्थ्यांना वाटते. यावरूनच असे स्पष्ट होते कि, वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना व्यावहारिक स्वरुपात डिजिटल पेमेंट हि संकल्पना स्वीकारीत असतांना मोठ्या अडचणी आहे. त्यातही ग्रामीण भागात संसाधनांची उपलब्धता नसल्याने मोठ्या प्रमाणावर या संकल्पनेचा वापर केला जात नाही.

आलेख क्र.२







Scanned with CamScanner

वरील आलेख क्र. २ मध्ये डिजिटल पेमेंट करतांना वापरल्या जाणार्या साधनांचे विश्लेषण दिले आहे. यात अॅप (पे टी ..म) सारख्याचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. क्रेडीट कार्ड कुणाच कडे नसून २१ टक्के मुले एटीएम कार्ड वापरतात. ..लाईन बँकिंग हे साधन फक्त १ टक्केच मुलांनी वापरले आहे.

**आलेख क्र.३**




वरील आलेखावरून असे स्पष्ट होते कि मोबाईल रीचार्ज करणेसाठीच महाविद्यालयीन विद्यार्थी डिजिटल ..मेंट जास्त करतांना दिसतात मात्र इतर पेमेंट करतांना मात्र त्यांना पेमेंट करतांना मोठ्या प्रमाणावर अडचणी ..तात किंवा ते प्रयत्न करतांना दिसत नाहीत.

**संशोधनातील समस्या :** वरील विश्लेषण आणि केलेल्या अभ्यासातून समोर आलेल्या समस्या पुढील प्रमाणे आहे.

१. डिजिटल पेमेंट हि संकल्पना अजून नवीन आहे.
२. डिजिटल पेमेंट याबाबतीत वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष/व्यावहारिक ज्ञान नाही.
३. डिजिटल पेमेंट करीत असतांना सुरक्षिततेची अडचण जसे पासवर्ड चोरी,व्यवहार अपूर्णता अशा समस्या जानावितात.
४. शैक्षणिक दृष्ट्या या आधुनिक संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत पोहचत नाहीत.
५. गरीब आणि ग्रामीण भागातील वाणिज्य शाखेतील महाविद्यालयीन तरुणांना जास्त अडचणी येतात.

## संशोधनातील उपाययोजना :

वरील समस्या सोडविण्यासाठी पुढील उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

१. डिजिटल पेमेंट हि संकल्पना सर्वत्र रुजली पाहिजे सर्वांनीच तिचा स्वीकार केला पाहिजे.



Scanned with CamScanner

२. वाणिज्य शाखेतील शिक्षणात व्यावहारिक ज्ञान म्हणून अभ्यासक्रमात प्रात्यक्षिकाचा समावेश केला पाहिजे.

३. सायबर गुन्हे होऊ नये, तसेच सुरक्षित व्यवहारांसाठी कडक नियंत्रण असावे. दंडात्मक कार्यवाहीची तरतूद असावी.

४. महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांना याचे फायदे आणि भविष्यकालीन संधी सांगून उद्युक्त करावे.

## संशोधनाचे निष्कर्ष

वरील अभ्यासानुसार असे स्पष्ट होते कि, डिजिटल पेमेंट प्रणाली हि आधुनिक काळाची गरज आहे. तरुणांनी पुढाकार घेतल्यास भ्रष्टाचार,काळापैसा, फसवणूक अशा गोष्टींपासून भारत मुक्त होणार आहे. म्हणूनच यासाठी तरुणांनी पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे आहे. वाणिज्य शाखेतील महाविद्यालयीन विद्यार्थांचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते कि, डिजिटल पेमेंट संकल्पना हि जरी या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली असली तरीही तिचा व्यावहारिक वापर मात्र हे विद्यार्थी करतांना दिसत नाहीत. म्हणूनच शिक्षणाच्या निमित्ताने त्यांच्यामध्ये हि संकल्पना रुजविण्याची गरज जाणविते. जेणेकरून डिजिटल पेमेंट सिस्टीमचा वापर करून वाणिज्य शाखेतील महाविद्यालयीन विद्यार्थी सुद्धा डिजिटल होतील.

## संदर्भ सूची :


- 'Digital Bank: Strategies to Launch or Become a Digital Bank' – Chris Skinner
- 'The End of Banking: Money, Credit, and the Digital Revolution' – Jonathan McMillan November 2014
- Reports of National Institution for Transforming India), Government of India 2016
- Digital India Book
- Push for digital payment ; The Hindustan Time,18,nov,2017
- High on Education :The Times Of India, 20/03/2017


Scanned with CamScanner